भुसावळ बदली प्रकल्पामध्ये लागणा-या खर्चासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादितमध्ये भांडवली गुंतवणूक.

सन २०१३-१४.

महाराष्ट्र शासन

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक:निधिवि-२०१३/प्र.क.९०/(३)/ऊर्जा-३,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: ३० मार्च २०१४

संदर्भ :- १. शासन परिपत्रक वित्त विभाग,क्र.अंदाज-२०.१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.२५ एप्रिल,२०१३

२. शासन परिपत्रक उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बीयुडी-२०१३/२०१३-२०१४/(६११)/प्रशासन-१, दि.१ एप्रिल, २०१३

३. शासन परिपत्रक उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बीयुडी-२०१३/२०१३-२०१४/(६११)/प्रशासन-१, दि.७ मे,२०१३

प्रस्तावना:-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पाचे, नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी येणा-या खर्चापैकी २० टक्के इतकी रक्कम गुंतवणूक करण्यासाठी राज्य शासनाकडून भांडवलाच्या रुपाने महानिर्मिती कंपनीस उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सदर रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१३-१४ या वर्षामध्ये रु.६८,८०,००,०००/- (रुपये अडूसष्ट कोटी ऐंशी लाख) इतकी सुधारित अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रु.३५,२०,०००/- (रुपये पस्तीस लाख वीस हजार) इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित यांना पुस्तकी समायोजनाव्दारे वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पाचे, नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी राज्य शासनाची भांडवली गुंतवणूक म्हणून रु.३५,२०,०००/- (रुपये पस्तीस लाख वीस हजार) इतकी रक्कम पुस्तकी समायोजनाव्दारे वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च अंदाजपत्रकीय लेखाशीर्ष मागणी क्र. के-११- "४८०१-वीज प्रकल्पावरील इतर भांडवली खर्च, ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक, पंचवार्षिक योजना - राज्य योजना, (००)(०३) भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१३७३१) ५४, गुंतवणूक " या खाली

खर्चा घालण्यात यावा व ता सन २०१३-२०१४ या वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतुदीमधून भागवावा.

वरील मंजूर झालेल्या भागभांडवलाची संपूर्ण रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मर्यादित यांना रोख न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मर्यादित यांचेकडून शासनास येणे असलेल्या रकमेपोटी वसूल करण्यात यावी, आणि खाली नमूद केलेल्या जमालेखाशिर्षाखाली समायोजनाव्दारे जमा करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये | जमा लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १ | वित्तीय वर्ष सन २०१३-२०१४ या वर्षातील भाडेपट्टीपोटी या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम. | ३५,२०,०००/- | ०८०१ वीज, (२२) इतर जमा रकमा, (२२) (०१) इतर जमा रकमा- महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून मिळणारी पट्टीची रक्कम. (०८०१०१६३) |
| | एकूण | ३५,२०,०००/- | |

४. सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल, मुंबई यांचे अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रक्कमेचे देयक तयार करण्यात येवू नये.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई यांनी त्यांच्या अखत्यारित आणि अधिकारात वरील विवरणपत्रानुसार सदर रक्कम रु.३५,२०,०००/- (रुपये पस्तीस लाख वीस हजार) चे पुस्तकी समायोजन करुन तसे शासनास कळवावे.

६. सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत असलेली रक्कम वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या कॅश फ्लोच्या मर्यादेत आहे.

७. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१३७/१४६१, दि.२०/०३/२०१४ नुसार दिलेल्या सहमतीने तसेच वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.१३९/१४/व्यय-१६, दि.२८/०३/२०१४ मधील मंजूरीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत सुत्रधार कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०० ०२०.

४. महालेखापाल (लेखा परिक्षा ), महाराष्ट्र-१, मुंबई-४०० ०२०.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.

६. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

७. निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

८. मुख्य अभियंता (विद्युत), महाराष्ट्र शासन, सा.बां.वि. प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

९. अवर सचिव (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. क.अ.(प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/साधनसंपत्ती/साऊ/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई-३२.

१२. निवड नस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.